पुण्य नगरी

# शिरपूर आयआयसीला 'सर्वोत्कृष्ट पोस्टर' पुरस्कार

## इंदौरच्या प्रादेशिक बैठकीत एसव्हीकेएम एनएमआयएमएसच्या नाविन्यपूर्ण कार्याची दखल

**शिरपूर :** शिक्षण मंत्रालयाच्या इन्स्टिटयूट इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) तर्फे इंदौर येथील ॲडक्रोपोलिस इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित प्रादेशिक बैठकीत एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. शिरपूर कॅम्पसच्या आयआयसीला 'सर्वोत्कृष्ट पोस्टर' या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले.

या परिषदेत ६८० हून अधिक सहभागी एकत्र येत नाविन्यपूर्ण संकल्पना, स्टार्टअप्स, पोस्टर सादरीकरणे आणि विविध उपक्रमांनी वातावरण उत्साहात भरून गेले. शिरपूर कॅम्पसच्या आयआयसीने सादर केलेले पोस्टर परीक्षकांनी उत्कृष्ट सर्जनशीलता, स्पष्टता आणि नाविन्यपूर्ण विचारांचे प्रभावी दर्शन घडवणारे असल्याचे नमूद केले.

आयआयसीचे कन्वेनर डॉ. सचिन भंडारी आणि आयआयसी-आयपीआर सेलचे फॅकल्टी इंचार्ज डॉ. शशिकांत बगाडे यांनी या बैठकीत पोस्टर सादर करून कॅम्पसचा लौकिक वाढवला. पोस्टरमध्ये कॅम्पसमध्ये वर्षभर राबविण्यात आलेल्या नाविन्य आधारीत कार्यशाळा, उद्योजकता विकास कार्यक्रम, हॅकॅथॉन्स, स्पर्धा आणि जनजागृती मोहिमा अशा उपक्रमांची प्रभावी मांडणी करण्यात आली होती.



या कामगिरीबद्दल आयआयसी शिरपूर कॅम्पसच्या अध्यक्षा डॉ. सुनीता पाटील, उपाध्यक्ष डॉ. श्याम पांचोली, डॉ. वेंकटाद्री एम. यांनी शिक्षक सदस्य व विद्यार्थ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे कौतुक केले. टीमने नाविन्य व उद्योजकता संस्कृती कॅम्पसमध्ये रुजविण्यासाठी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न या पुरस्कारातून अधोरेखित झाले.

या यशाबद्दल एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष, माजी मंत्री आ.अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, कॅम्पस प्रभारी रीता पटेल, डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील, तसेच सर्व अधिकारी व प्राध्यापकांनी पुरस्कार विजेत्या टीमचे कौतुक केले.

**Publication: Punyanagari**

**Edition: Shirpur**